उपविधान समिती

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

तिसरा अहवाल

(२०१६)

सत्यमेव जयते

(दिनांक ऑगस्ट, २०१६ रोजी विधानसभा/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई

२०१६

उपविधान समिती

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

तिसरा अहवाल

(२०१६)

उपविधान समिती

(सन २०१५-२०१६)

(१) श्री. विजयराव औटी, वि.स.स. तथा समिती प्रमुख.
(२) ॲड.रामचंद्र अवसरे, वि.स.स.
(३) श्री.अतुल भातखळकर, वि.स.स.
(४) ॲड.संजय धोटे, वि.स.स.
(५) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स.
(६) श्री.अमल महाडीक, वि.स.स.
(७) श्री.सुरेश भोळे, वि.स.स.
(८) श्री.तुकाराम काते, वि.स.स.
(९) श्री.अशोक पाटील, वि.स.स.
(१०) श्री.अमर काळे, वि.स.स.
(११) श्री. नितेश राणे, वि.स.स.
(१२) श्री.संग्राम जगताप, वि.स.स.
(१३) श्री.राहूल जगताप, वि.स.स.
(१४) श्री.सुभाष ऊर्फ पंडीतशेठ पाटील, वि.स.स.
(१५) श्री.विनायक मेटे, वि.प.स.
(१६) श्री.विक्रम काळे, वि.प.स.
(१७) श्री.आनंद ठाकूर, वि.प.स.
(१८) श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स.
(१९) श्री.अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री.सुभाषचंद्र मयेकर, विशेष कार्य अधिकारी
(३) श्रीमती पुनम ढगे, अवर सचिव
(४) श्रीमती सीमा तांबे, कक्ष अधिकारी.

प्रस्तावना

मी, उपविधान समितीचा समिती प्रमुख, समितीने तिच्या वतीने मला अहवाल सादर करण्यास अधिकार दिल्यानुसार समितीचा सन २०१६-२०१७ या वर्षातील कामकाजासंबंधीचा तिसरा अहवाल सादर करीत आहे.

या अहवालात समितीने १ प्रारूप अधिसूचना व २६ अंतिम अधिसूचना विचारात घेतल्या.

समितीने उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभागाच्या (अं.२४, २६, २७, २८, २९, ५२, २५, ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३५, ३६ व ५३) अधिसूचनांवर दिनांक १८ मे,२०१६ रोजी तसेच (अं.३७, ३८, ३९, ४०, ५४, ४१, ४२, ४३, ५८, ५० व ५६) अधिसूचनांवर दिनांक १४ जून,२०१६ रोजी संबंधित विभागांच्या सचिवांची साक्ष घेतली.

तसेच समितीने दिनांक १८ व ३१ मे,२०१६ व १४ जून,२०१६ अशा एकूण ३ बैठका घेतल्या.

या बैठकांमध्ये समितीने १ प्रारूप व २६ अंतिम नियम प्रसिद्ध करणाऱ्या अधिसूचनांचे परीक्षण केले. समितीने दिनांक २७ जुलै, २०१६ रोजी झालेल्या बैठकीत प्रारूप अहवालावर विचारविनिमय केला आणि किरकोळ सुधारणांसह तो संमत केला.

विधान भवन :
मुंबई,
दिनांक २७ जुलै २०१६.

विजयराव औटी
समिती प्रमुख,
उपविधान समिती.

अनुक्रमणिका

अनुक्रमांक (१)	विषय (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	उद्योग, उर्जा व कामगार (ऊर्जा) विभाग	
(एक)	**अधिसूचना क्रमांक ३७** - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग [महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेडच्या (एमएडीसी) मिहान विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी] विनियम, २०१३ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ तांत्रिक/परवाना अटी/ एमएडीसी/२०१३/१६५५, दिनांकित ३ डिसेंबर, २०१३.	१
	अधिसूचना क्रमांक ३८ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग [मे. सिरिन प्रॉपर्टीज प्रायव्हेट लि.(एसपीपीएल) च्या ऐरोली, ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी] विनियम, २०१३ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/तांत्रिक/परवाना अटी/ एसपीपीएल/२०१३/ ०१०८९, दिनांकित २१ ऑगस्ट २०१३.	
	अधिसूचना क्रमांक ३९ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे.इक्सोरा कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडच्या पनवेल, महाराष्ट्र येथील सेवाक्षेत्रविषयक विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ तांत्रिक/परवाना अटी/इक्सोरा/२०१४/०९५, दिनांकित १० एप्रिल, २०१४.	
	अधिसूचना क्रमांक ४० - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग [मे. क्वॅड्रॉन बिझिनेस पार्क लि. (क्युबीपीएल) च्या प्लॉट क्र.२८, राजीव गांधी इन्फो टेक पार्क, फेज-२ हिंजेवाडी, पुणे, येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी] विनियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ तांत्रिक/परवाना अटी/क्युबीपीएल/२०१४/ ०४८, दिनांकित ७ एप्रिल, २०१४.	
	अधिसूचना क्रमांक ५४ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग [मे. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा.लि.(जीइपीएल), ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया,	

(१)	(२)	(३)
	ऐरोली, जिल्हा ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी] विनियम, २०१५ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ तांत्रिक/ परवाना अटी/ जीइपीएल/ २०१५, दिनांकित २३ डिसेंबर २०१५.	
(दोन)	**अधिसूचना क्रमांक ४२** महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ तांत्रिक/विमुप्र/ विनियम/२०१४, दिनांकित २५ जून २०१४.	१३
(तीन)	नियम तयार करण्यास तसेच विधानमंडळासमोर अधिसूचना ठेवण्यास आणि समितीच्या उपयोगासाठी कागदपत्रे पाठविण्यास झालेला विलंब याचे विवरण.	१८
(चार)	उपविधान समितीने विचारात घेतलेले प्रारूप नियम	३२
(पाच)	उपविधान समितीने विचारात घेतलेले अंतिम नियम	३४
(सहा)	कार्यावलीचे परिशिष्ट	३८
(सात)	बैठकीचे कार्यवृत्त	४५

उद्योग, उर्जा व कामगार (ऊर्जा) विभाग

अधिसूचना क्रमांक ३७ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग [महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेडच्या (एमएडीसी) मिहान विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी] विनियम, २०१३ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/तांत्रिक/परवाना अटी/ एमएडीसी/ २०१३/ १६५५, दिनांकित ३ डिसेंबर, २०१३.

अधिसूचना क्रमांक ३८ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग [मे.सिरिन प्रॉपटीज प्रायव्हेट लि.(एसपीपीएल) च्या ऐरोली, ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी] विनियम, २०१३ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ तांत्रिक/परवाना अटी/ एसपीपीएल/२०१३/०१०८९, दिनांकित २१ ऑगस्ट २०१३.

अधिसूचना क्रमांक ३९ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे.इक्सोरा कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडच्या पनवेल, महाराष्ट्र येथील सेवाक्षेत्रविषयक विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/तांत्रिक/परवाना अटी/ इक्सोरा/ २०१४/०९५, दिनांकित १० एप्रिल, २०१४.

अधिसूचना क्रमांक ४० - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग [मे.क्वॅड्रॉन बिझिनेस पार्क लि. (क्यु बी पी एल) च्या प्लॉट क्र.२८, राजीव गांधी इन्फो टेक पार्क, फेज-२ हिंजेवाडी, पुणे, येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी] विनियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/तांत्रिक/ परवाना अटी/ क्युबीपीएल/२०१४/ ०४८, दिनांकित ७ एप्रिल २०१४.

अधिसूचना क्रमांक ५४ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग [मे.गिगाप्लेक्स इस्टेट प्रा.लि.(जीइपीएल), ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली, जिल्हा ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी] विनियम, २०१५ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ तांत्रिक/ परवाना अटी/ जीइपीएल/ २०१५, दिनांकित २३ डिसेंबर २०१५.

उद्देश

उपरोक्त ५ विनियम करण्यामागील उद्देश व कारणे यांची मिमांसा करताना विभागाने त्यांच्या स्पष्टीकरणात्मक टिप्पणीत असे नमूद केले आहे की,...

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने विद्युत अधिनियम,२००३ च्या कलम १८१ च्या खंड (डी) सह कलम १६ आणि कलम १४ च्या खंड (बी) अंतर्गत खालील विनियम अधिसूचीत केले आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग; मे.सिरीन प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड यांना ऐरोली, ठाणे; मे.क्वॅड्रॉन बिझिनेस पार्क लि. (क्युबीपीएल) च्या प्लॉट क्र.२८, राजीव गांधी इन्फो टेक पार्क, फेज-२ हिंजेवाडी, पुणे ; तसेच मे.गिगाप्लेक्स इस्टेट प्रा.लि.(जीइपीएल), ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली, जिल्हा ठाणे; येथील माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञानावर आधारित तसेच नागपूर येथील मिहान व इक्सोरा कंस्ट्रक्शन प्रायव्हेट लि.पनवेल या सेवाविषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी (आयटी आयटीइएस एसईझेड लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) करिता विनियम अधिसूचित केले आहेत.

उपरोक्त पाचही विनियमातील महत्त्वाच्या तरतूदी खालीलप्रमाणे आहेतः—

(१) या विनियमात उपरोक्त कंपन्यांकरिता (मानीव वितरण परवानाधारक) पुरवठ्याचे क्षेत्र अधिसूचित करण्यात आले आहे. भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालयाने सेझ अधिनियम, २००५ च्या कलम ४ च्या उप कलम (१) अंतर्गत निर्गमित केलेल्या अधिसूचींमध्ये विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र हे उपरोक्त कंपन्यांकरिता पुरवठ्याचे क्षेत्र राहील.

(२) माहिती तंत्रज्ञानावर आधारित क्षेत्राशी संबंधित उद्योगाकरिता चोवीस (२४) तास अखंडीत विजेचा पुरवठा करण्याची व्यवस्था करील.

(३) भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालयाने सेझ अधिनियम, २००५ च्या कलम ४ अंतर्गत निर्गमित केलेल्या सेझ अधिसूचनेच्या दिनांकापासून पंचवीस (२५) वर्षांच्या कालावधीकरिता किंवा परवाना रद्द करण्यात येत नाही तोपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत, परवाना अंमलात राहील.

(४) या विनियमातील विशिष्ट अटीसह आयोगाने अधिसूचित केलेले वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटीचे विनियम देखील उपरोक्त कंपन्यांच्या परवान्याच्या अटींना लागू राहतील.

(५) भविष्यात जर अधिसूचनेमुळे निरधिसूचनेमुळे पुरवठ्याच्या क्षेत्रात बदल झाल्यास महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी (एम. ए. डी. सी.) व मे. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा.लि.या अटींमध्ये सुधारणा करण्यासाठी आयोगाशी संपर्क साधतील.

उपरोक्त अधिसूचनांवर समितीने दिनांक १४ जून, २०१६ रोजी ऊर्जा विभागाचे सचिव व विद्युत नियामक आयोगाच्या संचालकांची तसेच संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली.

उक्त अधिसूचनेच्या अनुषंगाने समितीने अशी विचारणा केली की, समितीकडे ह्या अधिसूचना खूप विलंबाने प्राप्त झालेल्या आहेत. सन २०१३ ची सदर अधिसूचना सन २०१६ मध्ये समितीकडे पाठविली आहे. परंतु त्याबाबतची अंमलबजावणी यापूर्वी सुरू झालेली असते. याबाबत विभागाने असे स्पष्टीकरण दिले की, अधिसूचना विलंबाने सादर करण्याचे मुख्य कारण असे होते की, सन २०१२ मध्ये मंत्रालयास लागलेल्या

आगीमुळे किती अधिसूचनांना मान्यता मिळाली किंवा कसे, याचा शोध लागत नव्हता. परंतु नंतर सर्व रेकॉर्ड रिकन्सीलिएशन केल्यानंतर विभागाकडून कार्यवाही करण्यात आली. समितीने पाठविलेल्या पत्राच्या अनुषंगाने आम्ही एमईआरसीकडून पूर्तता करून त्यासंबंधी मार्च महिन्यात उत्तर पाठविलेले आहे. या संदर्भात विलंब झाल्याबाबत विभागाने मान्य केले.

या प्रकरणी समितीने अशी बाब निदर्शनास आणली की, परवान्यांचे वितरण करीत असताना जनरल कंडिशन्स टाकत असतात परंतु त्यांचा ड्राफ्ट अधिसूचनांसोबत जोडलेला नसतो. यामुळे अधिसूचना पूर्व प्रसिद्ध केली किंवा कसे, याबाबत समितीला काहीही माहिती मिळत नाही. पूर्व प्रसिद्धी दिली असल्यास किती प्रकारच्या हरकती प्राप्त झाल्या, त्यावर सुनावणी झाली का तसेच त्यासंबंधीचे कार्यवृत्त देखील उपलब्ध केले जात नाही, समितीसमोर अंतिम अधिसूचना येत असते. त्यात लहान प्रस्तावना दिली जाते. त्यामुळे वितरण परवान्यांच्या अटी नेमक्या काय आहेत, त्या सार्वमतासाठी प्रसिद्ध केल्या होत्या का, असल्यास त्यावर लोकांनी सकारात्मक किंवा नकारात्मक स्वरुपात अभिप्राय दिले असल्यास त्याबाबत समितीला काही माहिती मिळत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता याबाबत विभागाने खालीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले की, पटलावर एकूण ११ अधिसूचना आहेत. आपण मानीव वितरण परवान्याचा उल्लेख केला. त्यापैकी ५ परवाने एसईझेड अंतर्गत आहेत. शासनाच्या २००१ च्या आदेशानुसार ते परवाने एसईझेड अंतर्गत आले आहेत. सन २००७ च्या दरम्यान मिनिस्ट्री ऑफ इंडस्ट्री ॲण्ड कॉमर्सचे या संदर्भात एक परिपत्रक आले होते. त्या परिपत्रकाचा उद्देश असा होता की, महाराष्ट्रात नव्हेतर देशात विशेष आर्थिक क्षेत्र वेगळे करण्यात यावे, याबाबतचे उदाहरण म्हणजे आयोगाने सिरिन प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड, ऐरोली आणि नागपूर येथे मिहानकरिता एसईझेडकरिता परवाना दिला आहे. महावितरणकडून होणारा आणि एसईझेड दिल्यानंतर होणारा वीज पुरवठा या दोन्ही दरांमध्ये तफावत होती. ज्यांना एसईझेड लायसन्स दिले आहे ते जनरेटिंग कंपनीकडून डायरेक्ट सप्लाय घेतात. उद्योगांना चालना देणारी योजना सुरु आहे, त्या योजनेला विद्युत क्षेत्राचा हातभार लागला पाहिजे असा उद्देश होता. त्यानुसार आजच्या परिस्थितीत सिरिन प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड, ऐरोली आणि नागपूर येथील मिहान या एसईझेडसाठी दिलेले लायसन्स कार्यन्वित आहेत. एसईझेड क्षेत्रातील उद्योगांसाठी सदर दर आहेत. मिहान एसईझेडमध्ये मॅन्युफॅक्चरिंग पासून सर्व काही आहे. परंतु ऐरोली एसईझेडमध्ये आयटी व आयटी क्षेत्राशी निगडित इंडस्ट्रीज आहेत. अशाप्रकारे वेगवेगळ्या क्षेत्रांकरिता एसईझेड आहेत. आयोगाने परवाना देताना २५ वर्षांची अट टाकली आहे. यामुळे तेथे २४ तास वीज पुरवठा असणे आवश्यक आहे. तसेच परवाना धारक कंपनीला लागू असलेले नियम आणि निर्बंध एसईझेडला सुद्धा लागू असतील अशी त्यात अट आहे. याबाबत उदाहरण म्हणजे महावितरणचे परवाना धारक कंपनींचे महाराष्ट्रात १४ ग्राहक तक्रार निवारण मंच (सीजीआरएफ) आहेत. त्याच धर्तीवर एसईझेडमध्ये ग्राहक तक्रार निवारण मंच (सीजीआरएफ) असला पाहिजे. सिरिन प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेडला परवाना दिला त्यांच्याकडे ग्राहक तक्रार निवारण मंचाची (सीजीआरएफ) स्थापना केली आहे.

समितीने एसईझेडचा संदर्भ देऊन उर्वरित महाराष्ट्रात डी प्लस झोन आहेत, डी झोन आहेत, सी झोन आहेत तेथे कोणत्या दराने विजेचा पुरवठा केला जातो, अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, मुंबईत तीन डिस्ट्रीब्युशन लायसन्सी आहेत, लोकल ॲथॉरिटी बीईएसटी आहे, दुसरी टाटा व तिसरी रिलायन्स आहे. महावितरणला जो दर आहे तोच दर देण्यात येतो. महाराष्ट्रात उद्योगांसाठी वीज देण्याचे आज दोन प्रकार आहेत एक कन्टिन्युअस वीज पुरवठा कनेक्शन व नॉन कन्टिन्युअस वीज पुरवठा कनेक्शन. कन्टिन्युअस कनेक्शनसाठी विजेचा पुरवठा २४ तास असतो तर नॉन कन्टिन्युअस कनेक्शनसाठी विजेचा पुरवठा खंडीत होऊ शकतो. कन्टिन्युअस कनेक्शनसाठी विजेचा दर एक्स्प्रेस फिडरसाठी ७ रू २१ पैसे प्रति युनिट आहे, नॉन कन्टिन्युअस कनेक्शनसाठी ६ रूपये ७१ पैसे आहे. कन्टिन्युअस व नॉन कन्टिन्युअस कनेक्शन यामध्ये ५० पैशाचा फरक आहे.

विजेची जोडणी देतांना कन्टिन्युअस व नॉन कन्टिन्युअस कनेक्शन अशी देण्यात येत नाहीत, असे समितीने निदर्शनास आणले असता याबाबत विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, विजेची जोडणी देण्याची महावितरणची पद्धत अशीच आहे. कन्टिन्युअस किंवा नॉन कन्टिन्युअस वीज कनेक्शन घेण्याची मुभा ग्राहकाला आहे. आज वीज पुरवठ्याच्या दृष्टीने पाहिले तर कन्टिन्युअस आणि नॉन कन्टिन्युअस कनेक्शनमध्ये फारसा फरक राहिलेला नाही. महाराष्ट्रात विजेचा तुटवडा होता तेव्हा कन्टिन्युअस आणि नॉन कन्टिन्युअस वीज पुरवठ्याच्या कनेक्शनमध्ये फरक होता. आज कन्टिन्युअस आणि नॉन कन्टिन्युअस कनेक्शन असलेल्या ग्राहकांना पॉवर सप्लाय सारखाच होत आहे. आपण जो प्रश्न विचारला त्यानुसार इंडस्ट्रीला मुभा आहे की, त्यांनी नॉन कन्टिन्युअस म्हणून अर्ज केला तर त्याला टेरिफ कमी मिळतो. त्यांनी कन्टिन्युअस म्हणून कनेक्शन घेतले तर टेरिफ जास्त मिळतो कारण एमईआरसीने तसा दर ठरवून दिला आहे त्यामुळे उद्योगांना सध्याच्या पर्यायाचा वापर करता येतो. आता भरपूर लोक कन्टिन्युअसमधून नॉन कन्टिन्युअसमध्ये जाण्यासाठी अर्ज देतात कारण नॉन कन्टिन्युअसला देखील पॉवरची क्वॉलिटी कन्टिन्युअससारखीच आहे.

समितीने वीज पुरवठा सुरळीत करण्यात येत नसल्याबाबत अहमदनगर जिल्ह्यातील उदाहरण दिले व असे निदर्शनास आणले की, त्या भागातील एमआयडीसीमध्ये महावितरणचा विद्युत पुरवठा बऱ्याचवेळा खंडीत होत असतो. कारखाना सकाळी सुरू झाला तर त्याची एक सायकल चेन असते. वीज एक किंवा तीन तासासाठी कट झाली तर पुन्हा ते रि-सायकलिंग करण्यासाठी एक ते दीड तास जातो. त्याचा परिणाम एकूण प्रॉडक्शनवर होतो. आज उर्वरित महाराष्ट्रातील इंडस्ट्री केवळ वीज पुरवठा होत नाही म्हणून अडचणीत आली आहे. ७ रुपये २१ पैसे व ६ रुपये २१ पैसे विजेचा जो दर आहे तसेच सायमलटेनिसली एसईझेडसाठी ४ रुपये काही पैसे रेट आहे. तो एसईझेडसाठी कमी झालेला आहे. एसईझेडसाठी कमी दराने विद्युत पुरवठा करीत असाल तर उद्या अशी अडचण निर्माण होऊ शकेल की, केंद्र शासनाने कायदा केला असला तरी एमईआरसी व सीईआरसीच्या काही बाबी असल्या तरी दरात ७० ते ७५ टक्के तफावत राहत असेल तर सर्व उद्योजक एसईझेडमध्ये जावयाचे आहे अशी मागणी करतील. या प्रकरणी विभागीय प्रतिनिधींनी पुढीलप्रमाणे

खुलासा केला की, एसईझेडमध्ये वीज स्वस्त दराने मिळते. दुसरा पर्याय ओपन ॲक्सेसचा (मुक्त प्रवेश) आहे. विद्युत अधिनियम, २००३ च्या कायद्यात अशी तरतूद करण्यात आली आहे की, डिस्ट्रीब्युशन लायसन्सी व्यतिरिक्त इतर कोणाकडूनही सप्लाय घ्यावयाचा असेल तर घेता येईल. ती एक मुभा आहे. महाराष्ट्रात डिस्ट्रीब्युशन लायसन्सीकडे स्वतःची वीज वितरण प्रणाली आहे. ही वीज डिस्ट्रीब्युशन लायसन्सीच्या तारेतूनच येणार आहे. त्यांच्या तारेतून येणाऱ्या वीज प्रवाहामुळे महावितरणला विलिंग चार्ज द्यावा लागतो. यामध्ये रिटेल आणि होलसेल असा फरक आहे. होलसेलमधून वीज घेण्यात येते, अन्यथा रिटेलमधून वीज घेण्यात येते, यामध्ये थोडीफार तफावत असते.

समितीने या प्रकरणी असे निदर्शनास आणले की, वीजदरामध्ये थोडीफार तफावत नाही तर जास्त तफावत आहे. हा विषय उद्योगाशी संबंधित असला तरी महाराष्ट्रात उद्योगांचा विकास करण्याच्या दृष्टीने झोन तयार केले आहेत, त्यामुळे एक दिवस उद्योग कोलमडून पडतील.

यावर विभागीय प्रतिनिधींनी असे स्पष्ट केले आहे की, ही सर्व यंत्रणा दोन गोष्टीवर अवलंबून आहे. एक म्हणजे इंडस्ट्रीचे टेरिफ कमी व्हायला पाहिजे. त्या दृष्टीने ओपन ॲक्सेससाठी एसईझेड नाही तर कोणताही ग्राहक जाऊ शकतो. ओपन ॲक्सेसचा रेट कमी आहे. ज्या ग्राहकाला १ मेगावॅटपेक्षा जास्त विजेची आवश्यकता आहे, तो ओपन ॲक्सेसमध्ये जाऊ शकतो. ओपन ॲक्सेसमधील कंपन्या जनरेटर कंपनीशी करार करतात. तारेमधून जी वीज जाते तेथे ज्या डिस्ट्रीब्युशन लायसन्सीचे नेटवर्क आहे, त्याचा विलिंग चार्ज ठरविलेला आहे, तो विलिंग चार्ज आणि जनरेशनची कॉस्ट या दोन्ही मिळून जी कॉस्ट तयार होईल, ती कोणत्याही डिस्ट्रीब्युशन कंपनीपेक्षा कमी राहील. तो ओपन ॲक्सेसचा ग्राहक झाला तर त्याला फायदा व्हावा हा त्यामध्ये भाग आहे.

ज्या अटी आहेत त्या वर्तमानपत्राच्या माध्यमातून लोकांसमोर सादर केल्या होत्या काय? त्यावर जनतेची सुनावणी झाली आहे काय? त्याचे प्रोसिडिंग आपणाकडे आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागाने असे स्पष्ट केले की, भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाची २००५ चे विनियम तयार करताना पूर्व प्रसिद्धी पद्धत आहे, सर्व राज्यांना विनियम तयार करण्याची पद्धत दिली आहे, ती अनुसरावयाची आहे. या पद्धतीनुसार एक महिना हा मसुदा वेबसाईटवर सूचना व हरकतीसाठी प्रसारित करावा लागतो. तसेच दोन मराठी व दोन इंग्रजी वर्तमानपत्रात प्रसारीत करावा लागतो. आलेल्या सूचना विचारात घेऊन नंतर आयोगाला अधिसूचित कराव्या लागतात.

त्यावर समितीने अशी सूचना केली की, हा नियम पाळला गेला आहे काय? नियमाचे पालन झाले असेल तर त्याचे कार्यवृत्त समितीला सादर करावे. एकूण किती हरकती प्राप्त झाल्या आहेत, त्यापैकी किती हरकती विचारात घेतल्या, त्यातील किती स्वीकारल्या आहेत, किती नाकारल्या आहेत हे समितीला कळणे आवश्यक आहे. या प्रकरणी विभागाने असे स्पष्ट केले की, नुकतेच आयोगाने स्टेटमेंट ऑफ रिझन म्हणून एक ऑर्डर इश्यू करणे सुरू केले आहे, मुक्त प्रवेश विनियम २०१६ जेव्हा आयोगाने तयार केला, त्यावेळी

स्टेटमेंट ऑफ रिझन सुरू केले. त्या स्टेटमेंट ऑफ रिझनसमध्ये हे रेग्युलेशन कधी प्रकाशित केले, त्यावर ९१ तक्रारी आल्या होत्या, प्रत्येक तक्रारी कोणत्या होत्या, त्यावर आयोगाचा काय निर्णय आहे, हे स्टेटमेंट ऑफ रिझनस करू न आयोगाने प्रकाशित केले आहे. ही प्रोसिजर आता रिसेंटली सुरु केली आहे. त्या अगोदर पूर्णपणे प्रोसिजर नुसार काम करीत होतो, स्टेटमेंट ऑफ रिझनस इश्यू केले जात नव्हते. आता पूर्ण ट्रान्सपरन्सी करण्यासाठी स्टेटमेंट ऑफ रिझन्स सुद्धा विनियमासोबत इश्यू करीत आहोत. सन २०१३ मध्ये ज्या हरकती व सूचना मागविल्या होत्या त्यांचे संपूर्ण तपशील आहेत.

उपरोक्त सर्व विनियमासंदर्भातील अधिसूचनांच्या अनुषंगाने विद्युत नियामक आयोगाने आश्वासित केलेली माहिती समितीस सादर केली आहे.

या अधिसूचनांसंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी असेही स्पष्ट केले की, विद्युत अधिनियम, २००३ यामध्ये सन २०१० मध्ये भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या अधिसूचनेप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे. दिनांक ४ मार्च, २०१० च्या सुधारणेप्रमाणे अधिसूचित क्षेत्र एसईझेड आहे, त्या अधिसूचित क्षेत्राला वीज परवाना देण्यासाठी त्यांना डीम डिस्ट्रीब्युशन लायसन्सचे स्टेटस दिले आहेत, अधिसूचनेच्या टर्मच्या तारखेपासून तो २५ वर्षे परवाना राहील. या दोन गोष्टी पाच एसईझेडमध्ये दर्शविल्या आहेत. महाराष्ट्रात नोटिफाईड ५२ एसईझेड आहेत, त्यापैकी २५ एसईझेड ऑपरेशनल आहेत, २५ एसईझेडपैकी पाच एसईझेडने संपर्क साधल्यानंतर आम्ही त्यांना वीज परवाना क्षेत्र आणि त्यांच्या विजेच्या कार्यकाळासाठी परवाना देऊन रिकग्नाईज केले आहे. त्यांच्याकडे वीज परवाना क्षेत्र आहे, त्यांना अधिसूचनेच्या तारखेपासून २५ वर्षे दिलेली आहेत.

याबाबत समितीने अशी विचारणा केली की, २५ वर्षाच्या काळात त्यामध्ये काही बदल करावयाचे असतील तर तो अधिकार कोणाला आहे? या प्रकरणी विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, प्रत्येक एसईझेडचे रेव्हेन्यू मिक्स वेगळे असणार आहे. मिहान एसईझेडचे क्षेत्र १५०० हेक्टर आहे. सिरिन प्रॉपर्टीज एसईझेडचे क्षेत्र ११ ते १२ हेक्टर आहे. प्रत्येक एसईझेडचा रेव्हेन्यू मिक्स वेगवेगळा आहे. सेल्स मिक्स वेगळे असल्यामुळे प्रत्येकाचा टॅरिफ वेगळा असणार आहे. तो अधिकार आयोगाला आहे. प्रत्येक वर्षासाठी वेगळा दर असणार आहे. समजा सिरिन प्रॉपर्टीज एसईझेड आयोगाकडे संपर्क केल्यानंतर ते परवाना दिलेला असल्यामुळे पुढील ४ वर्षांसाठी दर निश्चित करण्याकरिता याचिका करतात. बहुवर्षीय वीज दर (एमवायटी) रेग्युलेशन आहे त्या पद्धतीने ४ वर्षाचे दर निश्चित करण्यासाठी आयोगाकडे याचिका आलेली आहे. त्या याचिकेवर पब्लिक हिअरिंग झालेली आहे आणि ती याचिका आयोगाकडे प्रलंबित आहे. त्या याचिकेनुसार ४ वर्षासाठी विजेचा दर ठरविण्यात येईल. मिडटर्म रिव्ह्यू ठेवलेला आहे. म्हणजे दीड वर्षे झाल्यानंतर पुन्हा आयोगाशी संपर्क करून जो दर ठरविलेला आहे त्यामध्ये काही तफावत असेल आणि त्याबाबत त्यांनी व्यवस्थित माहिती दिली तर ती तफावत दूर करून पुढील दोन वर्षासाठी विजेचे दर ठरविले जातात. आता सन २०१६-१७ ते २०१९-२० पर्यंतची याचिका समोर आहे. जरी २५ वर्षाचा परवाना दिलेला असला तरी ४ वर्षे वगळता

उर्वरित २१ वर्षासाठी पुन्हा याचिका सादर करावी लागेल. पब्लिक हिअरिंगमध्ये कोणतीही व्यक्ती भाग घेऊ शकते. संपूर्ण प्रोसिजर सारखीच आहे. इक्सोरा ही पनवेल येथील कंपनी आहे. यामध्ये सर्वात मोठा एसईझेड मिहानचा आहे आणि त्याचे क्षेत्र ४ हजार एकर आहे. मिहान एसईझेड एमएडीसीने विकसित करण्यासाठी घेतलेला आहे. महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (एमएडीसी) ही शासकीय कंपनी आहे. ज्यावेळी मिहान प्रोजेक्ट आला त्यावेळी ते महावितरण कंपनीकडून वीज पुरवठा घेत होते. बुटीबोरी येथे ३०० मेगावॅटचे २ पॉवर प्रोजेक्टस् आहेत. तसेच, अभिजित एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचा पॉवर प्राजेक्ट आहे. तो प्रोजेक्ट ३ वर्षासाठी रिलायन्स कंपनीला वीज पुरवठा करीत आहे. आता जो नवीन प्लँट आहे तो बुटीबोरी प्रोजेक्ट आहे. तो विदर्भ इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेडचा प्लँट आहे.

समितीने असे निदर्शनास आणले की, अधिसूचनेत असे नमूद केलेले आहे की,सेझ अधिसूचनेच्या दिनांकापासून म्हणजे १९ फेब्रुवारी, २००९ पासून २५ वर्षांचा कालावधी किंवा परवाना रद्द करण्यात येत नाही तोपर्यंत, यापैकी जे आधी घडेल, तोपर्यंत परवाना अंमलात राहील. " दिनांक १९ फेब्रुवारी, २००९ रोजी एमओयू झालेला आहे काय, आपण नोटिफिकेशन सन २०१४ मध्ये कसे काय काढले याबाबत विभागाने असे स्पष्ट केले की, भारत सरकारच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाने जी अधिसूचना प्रसिद्ध केली आहे त्या अधिसूचनेच्या तारखेपासून मे. इक्सोरा कन्स्ट्रक्शन प्रा. लि., ला परवाना दिलेला आहे. वाणिज्य व उद्योग मंत्रालयाकडून त्यांना २००९ मध्ये नोटिफिकेशन मिळाले. ते ज्यावेळी ॲप्रोच झाले त्यावेळी सन २०१२-२०१३ सुरू होते. त्यानुसार परवाना वितरीत केलेला आहे. विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १४ नुसार २५ वर्षासाठी जो परवाना द्यावयाचा आहे. तो अधिसूचित तारखेपासून द्यावयाचा आहे.

समितीने अशी विचारणा केली की, दिनांक १९ फेब्रुवारी, २००९ पासून २५ वर्षासाठी परवाना देण्यात येतो तर त्याचे नोटिफिकेशन सन २०१४ मध्ये कसे काय काढण्यात आले?

याबाबत विभागाने असे स्पष्ट केले की, केंद्र शासनाने अधिसूचना प्रसिद्ध केली. त्यानंतर उपरोक्त उद्योगांनी सन २०१२-२०१३ मध्ये आयोगाकडे परवान्यासाठी अर्ज केला. एसईझेडचे जे प्रकल्प आहेत ते सध्या लायसन्सी कडूनच वीज पुरवठा घेतात. ज्यावेळी आयोगाकडे परवान्यासाठी अर्ज केला त्यावेळी आयोगाने परवाना दिला. परंतु, इक्सोरा कन्स्ट्रक्शन प्रा. लि.ची अधिसूचना जरी सन २००९ मध्ये निर्गमित झाली तरी संबंधित उद्योग आयोगाकडे सन २०१२-२०१३ मध्ये आले तरी त्यापूर्वी त्यांच्याकडे महावितरण कंपनीची वीज येत होती. कारण, अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर केव्हा अर्ज करावयाचा याची मुभा त्यांच्याकडे आहे. तोपर्यंत ते उद्योग बाहेरून म्हणजे आयपीपी किंवा महावितरणकडून वीज घेत होते. त्यांना जी मुभा आहे त्या प्रमाणे त्यांनी सन २०१२ मध्ये अर्ज केलेला आहे, असे त्यांचे म्हणणे आहे आणि ते कायद्यानुसार बरोबर आहे.

समितीने असे निदर्शनास आणले की, एसईझेड कंपन्यांनी त्यांनी सीईआरसी ॲक्टचा वापर केला आणि एमईआरसीला विचारात घेतले नाही असे यातून ध्वनित होते. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने सन २०१२ मध्ये हे निदर्शनास आणले किंवा त्यांची अधिसूचना राज्याकडे आली. त्यानंतर एमईआरसीने नियम हे सन

२०१४ मध्ये तयार केले. यामध्ये नमूद केलेले आहे की, दिनांक १९ फेब्रुवारी, २००९ पासून २५ वर्षाचा कालावधी किंवा असा परवाना रद्द करण्यात येत नाही तोपर्यंत, यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीकरिता अंमलात राहील. त्यामुळे सन २०१४ ला नियम तयार केले असे म्हणता येणार नाही कारण सन २००९ मध्ये परवाना दिलेला नाही. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी असे स्पष्टीकरण दिले की, समितीचे म्हणणे बरोबर आहे. ज्यावेळी डिस्ट्रीब्युशन लायसन्सीचा दर्जा दिला जातो त्यावेळी त्यांचे स्वतःचे इन्फ्रास्ट्रक्चर आहे काय, त्यांनी स्वतःची वायर वापरलेली आहे काय, ट्रान्सफॉर्मर टाकलेले आहेत काय, ब्रेकर्स आहेत काय या सर्व इन्फ्रास्ट्रक्चरची शहानिशा केल्यानंतर डिस्ट्रीब्युशन लायसन्सीचा दर्जा दिला जातो. एमईआरसीकडून परवाना दिला जातो. सन २००९ मध्ये जरी परवाना मिळाला असला तरी हा परवाना फक्त कागदावर होता. त्यांना डिस्ट्रीब्युशन लायसन्सीसाठी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप करण्याकरिता जी वर्षे लागली त्या काळात त्या एरियात जी डिस्ट्रीब्युशन लायसन्सी आहे त्यांच्याकडून त्यांनी सप्लाय घेतला आणि ज्यावेळी त्यांना असे वाटले की, आता त्यांचे इन्फ्रास्ट्रक्चर तयार झालेले आहे, त्यावेळी त्यांनी एमईआरसीकडे परवान्यासाठी अर्ज केला. मग एमईआरसीने त्यांचे कॅपिटल एक्सपेंडिचर तपासले. ही कंपनी परवाना देण्यायोग्य आहे काय याची शहानिशा केल्यानंतर त्यांना परवाना दिलेला आहे. त्यांना कागदोपत्री परवाना मिळाला. याबाबत एक उदाहरण पुढीलप्रमाणे आहे, रेल्वेला डिस्ट्रीब्युशन लायसन्सीचा दर्जा दिला गेला आहे. ओपन ॲक्सेसमधून एन्रॉनच्या आरजीपीपीएल प्रोजेक्टमधून डायरेक्ट सप्लाय घेतात. एकदा वितरण कंपनी झाल्यानंतर ज्या प्रमाणे अधिकार दिले त्याप्रमाणे जबाबदारी सुद्धा येणार आहे. त्यामुळे ते इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप करण्यासाठी काही वर्षे घेतात आणि त्यानंतर एमईआरसीकडे ॲप्रोच होतात.

सीईआरसी ॲक्टनुसार उपरोक्त उद्योगांनी हे सर्व केले आणि त्यांचे स्वतःचे इन्फ्रास्ट्रक्चर तयार झाल्यानंतर एमईआरसीकडे अर्ज केला. तोपर्यंत त्यांचे स्वतःचे इन्फ्रास्ट्रक्चर तयार झालेले नसेल. म्हणून ते ४ वर्षानंतर एमईआरसीकडे आले, असा त्याचा अर्थ आहे. यामध्ये एमईआरसी ॲक्टचे उल्लंघन झाले काय अशी विचारणा समितीने केली असता याबाबत विभागीय प्रतिनिधींनी स्पष्ट केले की, कोणाकडून सप्लाय घ्यावयाचा हा त्यांचा अधिकार आहे. जर त्यांना वाटले की, ते तयार आहे आणि ते ओपन ॲक्सेसला जाऊ शकतात किंवा ते स्वतःची कंपनी चालवू शकतात तर अशा वेळी ते एमईआरसीकडे येऊ शकतात. मिहानचे उदाहरण बघितले तर त्यांना सन २००७ मध्ये परवाना दिलेला आहे. आता २०१६ साल सरू आहे. ते ज्यावेळी एमईआरसीकडे आले त्यावेळीच आम्ही त्यांना परवाना दिलेला आहे. तोपर्यंत ते महावितरण कंपनीकडूनच सप्लाय घेत होते त्यामुळे स्वीच ओव्हर करण्यासाठी थोडा अवधी लागतो.

सिरीन प्रॉपर्टीच्या बाजूला गिगाप्लेक्स ही रहेजाची प्रॉपर्टी आहे आणि या एसईझेडला परवाना दिलेला आहे. परंतु अद्यापपर्यंत याचिका सादर केलेली नाही. ऐरोली येथील सिरिन प्रापर्टी ही याचिका दाखल केलेली महाराष्ट्रातील एकमेव प्रॉपर्टी आहे.

परवाना देताना काही चार्जेस भरावे लागतात काय? परवाना देण्याचे अधिकार कोणाला आहे अशी विचारणा समितीने केली असता याबाबत विभागीय प्रतिनिधींनी असे स्पष्ट केले की, परवाना द्यायचा अधिकार महाराष्ट्र नियामक आयोगाला आहे. परवाना देताना रिट पिटीशनची फी महाराष्ट्र शासनाने ५ लाख रु पये ठरविलेली आहे. नंतर दरवर्षी ॲन्युअल लायसन्स फी त्यांच्या रेव्हेन्युच्या ०.०५ टक्के आकारलेली आहे. ही डीम्ड लायसन्सी असल्यामुळे यांना डिस्ट्रीब्युशन लायसन्स ॲप्लीकेशन करीत नाही. विद्युत अधिनियम २००३ नुसार डीम्ड लायसन्स स्टेटस केलेले आहे. त्यांनी फक्त आयोगाकडे डीम्ड डिस्ट्रीब्युशन लायसन्स रेकॉर्डवर घेण्यासाठी पिटीशन (याचिका) फाईल केली होती. त्यामुळे त्यांना ५ लाख रुपये ॲप्लीकेबल नव्हते तर त्यांना १० हजार रुपये पिटीशन फी आकारली जाते. अधिसूचना ही केंद्र सरकारने प्रसिद्ध केली आहे. एमईआरसीकडे केवळ उद्योग परवान्यासाठी येतात तेव्हा त्यांची शहानिशा करते. प्रत्येक राज्याकरिता एसईझेडनुसार अधिसूचना काढण्यात आलेली आहे.

समितीने अशी विचारणा केली की, केंद्र सरकारने एसईझेडवाईज नियम अधिसूचित केले आहेत काय तसेच एका एसईझेडमध्ये दोन डिस्ट्रिब्युटर नाहीत काय याबाबत विभागीय प्रतिनिधींनी असे स्पष्ट केले की, केंद्र सरकारने एसईझेडवाईझ अधिसूचित केले असून त्यांनी तारखा देखील तशा दिल्या आहेत. प्रत्येक क्षेत्रफळाला त्यांनी नोटिफाईड एरिया केले आहेत तसेच एका एसईझेडला एकच डिस्ट्रिब्युटर आहे. क्षेत्रफळही त्यांनीच डिसाईड केलेले आहे. त्यानंतर तेथे कोणत्या प्रकारचा उद्योग चालेल हे देखील त्यांनीच ठरविलेले आहे.

एका एसईझेडमध्ये एका वितरकाने वितरणाचे काम सुरु केले व तेथे एखाद्या व्यक्तीने एक फॅक्टरी उघडली तर त्याच्याकडूनच वीज पुरवठा घेतला पाहिजे असे आहे काय, समजा महावितरणकडून वीज घ्यावयाची असेल तर तसा पर्याय असेल काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी असे स्पष्ट केले की, आपण दुसऱ्या वितरकाकडून वीज घेऊ शकता. त्या एसईझेड क्षेत्रासाठी ते सेकंड लायसन्सी आहेत. परंतु, महावितरण (एमएचडीसीएल) हे संपूर्ण राज्यासाठी डिस्ट्रिब्युटर लायसन्सी आहेत. मिहान एसईझेडमध्ये ऑलरेडी तसेच चाललेले आहे, हे ५ लायसन्सी आहेत, ५ एसईझेडकरिता प्रत्येकाचे नियम वेगळे नाहीत तर ते सरसकट आहेत. २४ तास वीज दिली पाहिजे, परवाना २५ वर्षांचा आहे. परवाना रद्द करण्याचा अधिकार एमईआरसीकडे असेल. मल्टीजनरेटरकडून सप्लाय घ्यायचा असेल तरीही एमईआरसीकडे जावे लागेल असे ३-४ नियम बंधनकारक आहेत. ज्या पद्धतीची अट महावितरणला आहे त्याच पद्धतीने एसईझेड असेल तरी ग्राहक तक्रार निवार मंच (सीजीआरएफचा) एक सेल असला पाहिजे.

उद्योगांचे टॅरिफ ठरविताना मूळ वितरक असलेल्या महावितरणची त्यांची एनओसी घेता काय? या वितरकाने दोन रु पयांचा रेट दिलेला आहे. महावितरणला तो दोन रु पयांपेक्षा कमी किंवा जास्तीने देण्यास तयार आहे ते महावितरणला ऑन रेकॉर्ड विचारता काय अशी विचारणा समितीने केली असता विभागाने असे स्पष्ट केले की, महावितरणला तशी विचारणा करण्यात येत नाही, त्यांना परवाना दिला आहे, त्यांना मुभा आहे की, ते देशातील कोणत्याही जनरेटरकडून वीज घेऊ शकतात.

एका एसईझेडकरिता केंद्र शासनाने अधिसूचित केलेले आहे. You can distribute power in the particular SEZ. परंतु, मूळ लायसन्सी महावितरण आहे. जोपर्यंत टॅरिफ मंजूर करीत नाही तोपर्यंत महावितरण तेथे सप्लाय करते त्यानी ॲप्लिकेशन केल्यानंतर टॅरिफ ठरविताना महावितरणला विचारण्यात येते का, की त्यांचे टॅरिफ काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, याचिका येतात त्याप्रमाणे महावितरणचे टॅरिफ ठरलेलेच आहे. महावितरणचे सबंध राज्यासाठी टॅरिफ सारखेच आहे. एसईझेडमध्ये कमर्शिअल उद्योग सुरु असेल तर महावितरण त्यांना बाकी ठिकाणी कर्मशिअल उद्योगाकरिता जे रेट आहेत त्याच दराने वीज देते, दर एकच आहेत.

महावितरणचा रेट संपूर्ण महाराष्ट्राकरिता एकच असतो. आपल्याकडे असलेल्या ॲग्रिकल्चर कन्झम्पशनसाठी रेट कमी ठेवावे लागतात. इंडस्ट्रिअल कन्झम्पशन असल्याने रेट जास्त ठेवावे लागतात कारण ॲग्रिकल्चरचे कन्झम्पशन क्रॉस सबसिडाईज करायचे असते. रेसिडेन्शिअल कन्झम्पशन देखील आहे. ० ते १०० युनीट कन्झ्युम करणारे भरपूर ग्राहक आहेत. त्यांचे रेट कमी करावे लागतात. जे जास्त कन्झ्युम करतात त्यांचे रेट जास्त ठेवावे लागतात.

समितीने अशी विचारणा केली की, एमईआरसी विजेचे दर निश्चित करते तर विभागाने एसईझेड व इतर औद्योगिक कंपन्यांना वेगवेगळे दर देण्याबाबत विचारणा केली आहे काय तसेच महावितरण व खाजगी वितरकांमध्ये कोणतीही स्पर्धा नाही काय, याबाबत विभागीय प्रतिनिधींनी स्पष्ट केले की, एसईझेड फक्त उद्योगांना पुरवठा करतात. ते काही शेती किंवा निवासी ग्राहकांना पुरवठा करीत नाही. त्यामुळे ते एसईआरसीपेक्षा कमीच दराने सप्लाय करणार महावितरण त्यांच्याशी तशी स्पर्धा कधी करु शकणार नाही कारण त्यांचे ग्राहक हे उद्योग आणि व्यवसायिक आहेत. तो सबसिडाईज रेटमध्ये सप्लाय करणार नाही. आपल्या ग्राहकांमध्ये २५ ते ३० टक्के ग्राहक शेतकरी आहे. ३० टक्के ग्राहकांना महावितरणला सबसिडाईज रेटने वीज द्यावी लागत असल्याने टॅरिफ त्यांच्यापेक्षा जास्तच असणार आहे. त्यामुळे खाजगी वीज वितरकांसोबत स्पर्धा होऊ शकणार नाही.

क्लासिकल डिबेट्समध्ये डिस्ट्रिब्युटर लायसन्सी म्हणून कोणत्या रेटने कोणाला वीज द्यायची याबाबतचे फ्रिडम पाहिजे. तसेच यामध्ये सर्वात जास्त तोटा बेस्टला होत आहे. बेस्टच्या सप्लायवर ट्रान्सपोर्ट अवलंबून आहे. आज बेस्टला वाहतुकीमध्ये जो तोटा होतो त्याचा समतोल वीज पुरवठ्याच्या माध्यमातुन साधला जातो. रिलायन्स व बाकी कंपन्यांनी मुंबईमध्ये फक्त हॉटेल इंडस्ट्रीला सप्लाय करण्याचे ठरविल्यामुळे बेस्टला निवासी ग्राहकांना कम्प्लसरी कमी दराने वीजपुरवठा करावा लागतो. यामध्ये काही बंधन आहे काय असा प्रश्न समितीने केला असता विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, महावितरणचे एक लाख एमयुएस जातात त्यापैकी २५ टक्के शेती होते. आपण कोणाचा दर कमी करायचे म्हटले तर दुसऱ्याचा दर वाढवावा लागतो कारण ती क्रॉस सबसिडी आहे. एसईझेडचे टॅरिफ कमी असण्याचे कारण म्हणजे तो क्रॉस सबसिडी

करीत नाही. त्यामुळे जे उरलेले कन्झ्युमर आहेत त्यांच्यावर लोड येत नाही. तो रेग्युलेटरी बिझीनेस आहे. याकरिता एमईआरसीचा रोल असा आहे की, त्यांनी काठून व किती टक्क्यांनी वीज विकत घेतली ते तपासावे व १६ टक्के प्रॉफिट अलाऊड करावा.

जर शेतीकरिता १ रुपये २० पैसे युनीट प्रमाणे वीज देण्यात येते. २०० युनिटपेक्षा जास्त वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकाला वेगळे दर आकारण्यात येतात. हे सर्व कॉम्पनसेट करण्यात येते, परंतु उद्या पिंपरी, चिंचवड, पुणे किंवा मुंबई, पनवेल, ऐरोली येथील इंडस्ट्री सोडली तर ग्रामीण भागात उद्योग पोहोचण्याकरिता एमआयडीसीने ए, बी, सी, डी, डी प्लस असे झोन करून उद्योगांना तशी सबसिडी देऊन त्यांना कमी दराने वीज पुरवठा करण्यात आला आहे. आता नवीन पॉलिसीमुळे हे सर्व बदलले. एखादा कारखाना एमआयडीसीमध्ये आहे तो ६.२१ रुपये प्रति युनिट दराने वीज घेणार. परंतु तोच कारखाना नागपूरच्या मिहानमध्ये आल्यास त्याकरिता सव्वादोन रुपये प्रति युनिट दराने वीज मिळणार. ही तफावत ग्रामीण भागातील उद्योजकतेला प्रचंड मारक ठरू शकते. या सर्व गोष्टींचा विचार करता संपूर्ण महाराष्ट्रात बॅलन्स राहिला पाहिजे असे मत समितीने प्रदर्शित केले. नागरीकरण मोठ्या प्रमाणात होत असून जवळपास ४८ टक्के लोक शहरीकरणामध्ये आले आहेत. त्यांना मूळ ठिकाणी परत न नेल्यास भविष्यात मुंबईसारख्या ठिकाणी सुद्धा अनेक अडचणींना सामोरे जावे लागेल. सदर पॉलिसी आकर्षक वाटत असल्या तरी राज्याचे उद्याचे भविष्य काय आहे यामुळे एका विशिष्ट भागात अनुशेष आहे किंवा एखादा भाग पुढारलेला आहे असा समितीचा ॲप्रोच नाही. खाजगी कंपनीकडून एसईझेडमध्ये वीज घेतल्यास ती प्रति युनिट दोन किंवा दोन रुपये चाळीस पैसे इतक्या दराने मिळणार. परंतु तेथे न जाता इतर ठिकाणी कारखाना टाकायचा झाल्यास त्याकरिता महावितरणकडून प्रति युनिट ६.२१ रुपये दराने वीज विकत मिळणार आहे. ही मोठी तफावत आहे. यामुळे बाहेरच्या ठिकाणी उत्पादन करणाऱ्या उद्योजकाला मोठा तोटा सहन करावा लागणार आहे.

या प्रकरणी विभागीय प्रतिनिधींनी पुढीलप्रमाणे माहिती दिली की, एसईझेडला फायदा देण्याचे शासनाचे धोरण असले तरी त्याकरिता काही मर्यादा घातली पाहिजे. जेणेकरून डी प्लस किंवा ग्रामीण भागातील उद्योगांना बाधा येणार नाही. या संदर्भात समितीने उपस्थित केलेल्या मुद्याची आम्ही नोंद घेतो असे विभागीय प्रतिनिधी यांनी सांगितले.

डीम्ड लायसेन्सीकडे पहिल्या दिवसापासून जबाबदारी आली पाहिजे. उद्योग पूर्णपणे विकसित झाल्यानंतर स्वतःच्या लायसन्सची कंडिशन ऑपरेट करायची. तसेच ज्या भागात वीज पुरवठा करण्यासाठी लॉस मेकिंग असल्यास तेथे मेन लायसेन्सीनी कार्यवाही करायची. सदर मुद्दा आयोगाच्या निदर्शनास निश्चितपणे आणून दिला जाईल असे विभागीय प्रतिनिधींनी स्पष्ट केले.

अभिप्राय व शिफारशी :–

१. राज्यातील एखादा कारखाना एमआयडीसी मध्ये असल्यास त्यास ६.२१ रुपये प्रति युनिट या दराने वीज देण्यात येते. परंतु तोच कारखाना विशेष आर्थिक क्षेत्रात असल्यास त्यास २.२५ रुपये प्रति युनिट दराने वीज देण्यात येते. दरामधील ही तफावत ग्रामीण भागातील कारखानदारीला पोषक ठरू शकणार नाही. उद्योग वाढीसाठी चालना / उत्तेजन देणे व विकास साधणे हा शासनाचा एकंदरीत उदात्त हेतू विचारात घेऊन वीज दराबाबत समतोल राखण्याच्या दृष्टीने शासनाने योग्य ती कार्यवाही करावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्याच्या आत देण्यात यावी.

२. सेझ क्षेत्रासाठी अधिसूचित केलेल्या कंपन्या जोपर्यंत त्यांचे इन्फ्रास्ट्रक्चर तयार होत नाही तसेच जोपर्यंत त्यांना परवडते तोपर्यंत ते महावितरणकडून वीज घेतात. मग त्यांचे इन्फ्रास्ट्रक्चर तयार झाल्यानंतर दुसरीकडून वीज घेतात. तेव्हा इन्फ्रास्ट्रक्चर तयार झाल्यानंतरही काही ठराविक कालावधी करिता त्यांनी महावितरणकडून वीज घेणे बंधनकारक करावे, या संदर्भात योग्य ती कार्यवाही करून तसे नियम तयार करावेत अशी शिफारस समिती शासनास करीत आहे, यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्याच्या आत देण्यात यावी.

३. सदर अधिसूचनांसंदर्भातील अंतिम नियम उपविधान समितीकडे २ ते ३ वर्षाने पाठविण्यात आले. नियम पाठविण्यास झालेल्या विलंबाबाबत समितीने नापसंती व्यक्त केली असून विभागाने भविष्यात प्रत्येक अधिनियमांतर्गत असलेल्या तरतूदींनुसार तयार केलेले नियम प्रसिद्ध केल्याबरोबर ते उपविधान समितीकडे पाठविण्याबाबत दक्षता घ्यावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभाग

अधिसूचना क्रमांक ४२ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/तांत्रिक/विमुप्र/विनियम/ २०१४, दिनांकित २५ जून २०१४.

१. उद्देश :–

सदरहू नियम करण्यामागील उद्देश व कारणे यांची मिमांसा करतांना विभागाने समितीला स्पष्टीकरणात्मक टिप्पणीत असे कळविले होते की, ...

विद्युत अधिनियम, २००३ च्या उद्देशांपैकी एक उद्देश, पारेषण आणि वितरण यंत्रणेत आणि संबंधित सुविधांमध्ये भेदभावरहित मुक्त प्रवेश देणे, हा आहे. विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ४२ मध्ये ज्या ग्राहकांची विजेची मागणी १ मेगावॅट पेक्षा जास्त असेल अशा सर्व ग्राहकांकरीता राज्याकडून मुक्त प्रवेश सुरू करण्यात येईल, असे विनिर्दिष्ट करण्यात आले आहे. यामध्ये असे अभिप्रेत आहे की, १ मेगावॅट पेक्षा जास्त मागणी असणारे सर्व ग्राहक वितरण परवानाधारकाशिवाय अन्य कोणत्याही पुरवठादाराकडून वीज घेऊ शकतील.

विद्युत अधिनियम, २००३ मधील वरील तरतूदीच्या आधारे, आयोगाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४ हे २५ जून २०१४ रोजी अधिसूचित केले आहेत. या विनियमांनी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २००५, हे विनियम अधिक्रमित केले आहेत.

या विनियमांचा उद्देश मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून स्पर्धेस प्रोत्साहन देणे हा आहे.

२. गोषवारा :–

१. ज्या ग्राहकांची करारांतर्गत मागणी १ मेगावॅट आणि त्यापेक्षा जास्त असेल आणि मुक्त प्रवेशासाठी उपलब्ध करून द्यावयाची वीज १ मेगावॅट आणि त्यापेक्षा जास्त असेल, असे ग्राहक वितरण यंत्रणेत मुक्त प्रवेशाची मागणी करण्यासाठी पात्र असतील.

२. ग्राहक पॉवर एक्स्चेंजच्या माध्यमातून " वीक अहेड " तत्त्वावर वीज घेण्यासाठी मुक्त प्रवेश उपलब्ध करून घेऊ शकतील.

३. ग्राहक त्यांच्या नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाची पूर्तता करण्यासाठी बहुविध निर्मिती कंपन्यांकडून मुक्त प्रवेश उपलब्ध करून घेऊ शकतील.

४. वितरण फ्रॅन्चायसी क्षेत्रातील व्यक्तीगत पात्र ग्राहक मुक्त प्रवेशासाठी अर्ज करू शकतील. तथापि, वितरण फ्रॅन्चायसी मुक्त प्रवेशाची मागणी करण्यास पात्र असणार नाही.

५. प्रत्येक वितरण परवानाधारक आयोगाची पूर्व-परवानगी घेऊन मुक्त प्रवेशासाठी अर्ज करण्याची कार्यपद्धती निश्चित करतील आणि ही कार्यपद्धती त्याच्या संकेत-स्थळावर प्रकाशित करील.

६. मुक्त प्रवेशाच्या कालावधीची व्याख्या विनियमांमध्ये खालीलप्रमाणे करण्यात आलेली आहे :–

(अ) अल्प-कालीन मुक्त प्रवेश एका वेळेस एक (१) महिन्यापेक्षा जास्त नसलेल्या कालावधीसाठी

(ब) मध्यम-कालीन मुक्त प्रवेश तीन (३) महिन्यांपेक्षा जास्त परंतु तीन (३) वर्षांपेक्षा जास्त नसलेल्या कालावधीसाठी.

(क) दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश बारा (१२) वर्षांपेक्षा जास्त परंतु पंचवीस (२५) वर्षांपेक्षा जास्त नसलेल्या कालावधीसाठी.

७. ग्राहकाने वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेत जर मुक्त प्रवेशाची मागणी केली असेल तर ग्राहकाने मुक्त प्रवेशाकरीता जितकी विजेची मागणी केली असेल तितकी वीज वितरण परवानाधारक ग्राहकाच्या करारांतर्गत मागणीतून कमी करील.

८. मुक्त प्रवेश ग्राहक जर त्याची वीज नूतनशील ऊर्जा निर्मात्याकडून घेणार असेल तर अनिश्चित नूतनशील ऊर्जा निर्मात्याच्या स्थापित क्षमतेच्या क्षमता वापराच्या घटकाच्या (सी यू एफ) मर्यादेपर्यंत, वितरण परवानाधारक ग्राहकाची करारांतर्गत मागणी/मंजूर भार कमी करील.

९. अनिश्चित नूतनशील ऊर्जा स्त्रोतांसाठी, वितरण परवानाधारकाकडून, मुक्त प्रवेश ग्राहकाच्या वापराचे समायोजन त्याच १५ मिनिटाच्या काल-गटात करून शिल्लक असलेली वीज वितरण परवाधारकाच्या मान्यता देण्यात आलेल्या सरासरी वीज खर्चाच्या दराने खरेदी करण्यात येईल.

१०. राज्य ग्रीडच्या कामकाजातील तांत्रिक मर्यादांच्या अधीन राहून आणि राज्य ग्रीड संहितेमधील आवश्यकतांच्या अधीन राहुन, जर ग्राहकांची मुक्त प्रवेश सेवा कमी करणे आवश्यक झाले तर, वितरण परवानाधारकाला देण्यात आलेला मुक्त प्रवेश सर्वात शेवटी कमी करण्यात येईल. इतरांपैकी, अल्प-मुदत मुक्त प्रवेश ग्राहक प्रथम कमी करण्यात येतील, नंतर मध्यम-कालीन मुक्त प्रवेश ग्राहक आणि त्यानंतर दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश ग्राहक कमी करण्यात येतील.

दिनांक १४ जून २०१६ रोजीच्या उपविधान समितीच्या बैठकीत ऊर्जा विभागाचे सचिव व विद्युत नियामक आयोगाच्या संचालकांची साक्ष घेण्यात आली. सदर बैठकीस महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे संचालकही उपस्थित होते.

समितीने महाराष्ट्र राज्य विद्युत आयोगाकडून दिनांक १ जून २०१६ रोजीच्या पत्रान्वये " राज्यातील मराठी माध्यमांच्या अनुदानित व विना अनुदानित पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वीज पुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करून त्यास मान्यता दिली आहे काय " या विषयाबाबतची माहिती मागवली असता महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाने सदर पत्रान्वये असे कळविले आहे की, " आयोगाकडून राज्यातील वीज वितरण कंपन्याचे वीज विक्रीचे दर ठरविताना विद्युत अधिनियमातील तरतूदी

विचारात घेण्यात येतात. वीज वापराच्या उद्देशानुसार विद्युत ग्राहकांची वर्गवारी ठरविण्यासाठी निवासी, आदिवासी इ. उद्देशांसाठी ग्राहक वर्गवारी तयार करण्यात आली आहे. निवासी वर्गवारीत घरगुती ग्राहकांचा तर सार्वजनिक सेवा या वर्गवारीत शाळा, रुग्णालये, शासकीय कार्यालये, संरक्षण संस्था इत्यादींचा समावेश होतो. " शाळा " सार्वजनिक सेवा या ग्राहक वर्गवारीत मोडतात. त्यामध्ये शासकीय व इतर सेवा अशी वर्गवारी आहे. ग्राहक वर्गवारी बदलण्याबाबतचा प्रस्ताव हा वीज वितरण कंपनीच्या वीज दर याचिकेचा भाग असतो. महावितरणने मराठी माध्यमांच्या शाळांना घरगुती दराने विशिष्ट वर्गवारी अंतर्गत वीज पुरवठा करण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव दिलेला नाही. तसेच राज्य शासन विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६५ अन्वये कोणत्याही ग्राहक वर्गवारीसाठी अनुदान देऊन कमी वीज दर आकारण्याचा निर्णय घेऊ शकते. "

सदर माहिती समितीच्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आली व त्यानुषंगाने विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेण्यात आली.

समितीने साक्षीदरम्यान अशी विचारणा केली की, ग्रामीण भागात ज्या प्राथमिक शाळा चालविल्या जातात, त्या जिल्हा परिषदेच्या किंवा खाजगी संस्थांच्या असतात, त्यांना संगणक चालविण्यासाठी व इतर बाबींसाठी वीज पुरवठा करण्यात येतो, त्यासाठी त्यांना विजेचा दर आकारण्यात येतो, या संस्था दोन किंवा तीन तासांपेक्षा जास्त वीज वापरीत नाहीत, कारण त्या सर्व शाळा सकाळच्या आहेत, सायंकाळच्या नाहीत, त्या शाळांसाठी देण्यात येणाऱ्या विजेचे दर घरगुती दराप्रमाणे असावेत, अशी विनंती बऱ्याच दिवसापासून सदस्य महावितरणकडे करीत आहेत, विभागाकडून तसा प्रस्ताव एमईआरसीकडे गेला पाहिजे, आता जे प्रस्तावित केले त्याचा यात समावेश आहे काय ?

तसेच याप्रकरणी समितीचे असे मत आहे की, मुले मराठी शाळेत शिकतात, या मुलांच्या शाळेसाठी जो वीज पुरवठा करण्यात येतो त्यासाठी जो दर आकारण्यात येतात तो दर महाराष्ट्रात सर्वात कमी असायला पाहिजे, त्या लहान मुलांचा शिक्षणाचा हक्क भारतीय राज्यघटनेने मान्य केला आहे. महावितरण त्या शाळांना दोन रुपये प्रति युनिट प्रमाणे वीज पुरवठा करीत असेल आणि शाळेला एक रुपया प्रति युनिट प्रमाणे वीज पाहिजे असेल तर मधला एक रुपया शासनाने द्यावा, सदर पैसे शासनाच्या तिजोरीतून नाही तर डायरेक्ट शाळेच्या तिजोरीतून महावितरणला पाहिजे आहेत. वयाच्या १४ व्या वर्षापर्यंत या देशात जन्माला येणाऱ्या प्रत्येक बालकाला सक्तीचे आणि मोफत शिक्षण देण्याचा कायदा आहे, त्याला अनुसरुन शाळांमधील वीज दर अत्यंत कमी प्रमाणात असावेत यामध्ये रेट कोट करावयाचा असेल तर एक रुपया प्रति युनिट असावा. घरगुती वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठी स्लॅब तयार केले आहेत, १ ते १०० युनिट वापरणाऱ्यांना अमुक दर तर १०० ते २०० युनिट वापरणाऱ्यांना अमुक दर, २०० ते ४०० युनिट वापर असणाऱ्यांना अमुक दर, ५०० युनिट कोणी वापरील असेल, घरात चार फ्रिज आहेत, चार एसी आहेत, त्यांना वेगळा दर यापेक्षा महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक शाळांना देण्यात येणाऱ्या विजेसाठी किमान दर निश्चित करावा.

याबाबत विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, जेव्हा आपण एखाद्या संवर्गातील ग्राहकांचा दर कमी करतो, तेव्हा त्याचा बोजा दुसऱ्या संवर्गातील ग्राहकावर पडतो. त्यामुळे इंडस्ट्री आणि कमर्शिअलचा टेरिफ वाढतो. इंडस्ट्रीचा टेरिफ वाढल्यामुळे इंडस्ट्री ओपन एक्सेसमध्ये जातात. त्यामुळे जास्त पैसे देणारा ग्राहक महावितरणपासून दूर जातो. त्यातून मिळणारा पैसा अजून कमी होतो, कमी झालेला पैसा बाकीच्या राहिलेल्या ग्राहकांवर वाटप करावा लागतो. त्यामुळे जी इंडस्ट्री असते त्यांचे विजेचे दर आणखी वाढतात, त्यामुळे ते मोठ्या प्रमाणात ओपन ॲक्सेसमध्ये जातात. या संपूर्ण सर्कलचा दुष्परिणाम महावितरणवर होतो. इंडस्ट्री ग्राहकाचा दर आज ७ रु पये २१ पैशांपर्यंत पोहचला आहे. ॲग्रीकल्चरसाठी देण्यात येणाऱ्या विजेचा दर, पिण्याच्या पाण्याच्या योजनांना देण्यात येणाऱ्या विजेचा दर, शाळांसाठी देण्यात येणाऱ्या विजेचा दर, घरगुती वापराच्या विजेचा दर कमी करा अशा वेगवेगळ्या मागण्या आहेत, या मागण्या त्यांच्या दृष्टीने योग्य आहेत, त्यांचे दर कमी केले तर दर वाढविण्यासाठी फक्त उद्योग व वाणिज्यीक ग्राहक राहतात, उद्योगाचा दर जास्त वाढविला तर त्याचवेळी ते उद्योग ओपन ॲक्सेसमध्ये जातात. ओपन ॲक्सेस रेग्युलेशन कमिशनने आता डे अहेड अलाऊ केले आहे. म्हणजे एखाद्या उद्योगात २४ तास स्वस्त वीज मिळत असेल तर तो महावितरणकडून वीज विकत घेणार नाही. अशाप्रकारे महावितरणकडून वीज विकत घेतली नाही तर महावितरणला ज्या ग्राहकाकडून दोन पैसे जास्त मिळणार होते, ते मिळणार नाहीत. त्यामुळे या पैशाचा बोजा कोणावर टाकावा. त्यामुळे जे ग्राहक राहिले आहेत त्यांच्यावर तो बोजा टाकावा लागतो. त्यामुळे त्यांचा रेट वाढतो. या सर्वांचा समतोल आपण जोपर्यंत साधणार नाही तोपर्यंत यातून बाहेर पडणे कंपनीला शक्य होणार नाही. याप्रकरणी देखील समितीने विचार करावा, अशी विनंती विभागीय प्रतिनिधींनी समितीला केली.

या प्रकरणी समितीने असे मत व्यक्त केले की, प्राथमिक शाळांचे विजेचे दर कमी केल्यामुळे जास्त ओझे पडेल असे वाटत नाही. समितीचा प्रमुख मुद्दा आहे तो मराठी शाळांच्या संदर्भात, मराठी म्हणजे प्राथमिक शाळा, ज्या शाळा डोनेशन घेऊन मुलांना प्रवेश देतात त्यांच्यासाठी ही विजेची सवलत नाही. ही मागणी अनुदानित शासकीय आणि अशासकीय प्राथमिक शाळांसाठी आहे. ज्या टॉपच्या शाळा आहेत त्या शाळांची संख्या बरीच वाढलेली आहे. त्या शाळांमध्ये लिफ्ट आहेत, एअर कंडिशन क्लास रुम्स आहेत. अशा शाळा ज्युनिअर के.जी. मध्ये ॲडमिशन देताना पालकांकडून लाखो रुपये डोनेशन घेतात, अशा शाळांकडून औद्योगिक दराने विजेची आकारणी करावी.

या अधिसूचनेवर समितीने दिनांक १४ जून,२०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व त्यावर खालीलप्रमाणे शिफारस सुचविली आहे.

अभिप्राय व शिफारस :–

" भारतीय राज्य घटनेने सर्व बालकांना शिक्षणाचा हक्क मान्य केला आहे. त्यानुसार वयाच्या १४ व्या वर्षापर्यंतच्या बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचा कायदा केला आहे. आज मराठी शाळा फक्त काही टक्क्यांमध्ये शिल्लक राहिल्या आहेत, त्यामुळे राज्यातील सर्व बालकांना शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने राज्यातील सर्व प्राथमिक शाळांना कमी दराने वीज पुरवठा करण्याची नितांत गरज लक्षात घेऊन राज्यातील सर्व प्राथमिक शाळांना कमी दराने वीज पुरवठा करण्यात यावा " अशी शिफारस समिती शासनास करीत आहे. या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्यात कळविण्यात यावी.

(तीन)

परिशिष्ट - एक

(चार)

परिशिष्ट -दोन

परिशिष्ट-दोन

उपविधान समितीने विचारात घेतलेले प्रारुप नियम दर्शविणारे विवरणपत्र

आदिवासी विकास विभाग

प्रारुप अधिसूचना क्रमांक डी-५ : महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०१६ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एसटीसी - २०१६/प्र.क्र. १०५/ भाग (२)/ का-१०, दिनांकित ५ मे, २०१६

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक २७ जुलै, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व त्यावर काहीही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

(पाच)

परिशिष्ट - तीन

परिशिष्ट-तीन

उपविधान समितीने विचारात घेतलेले अंतिम नियम दर्शविणारे विवरणपत्र

उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभाग

१. अधिसूचना क्रमांक २४ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक यंत्रणांकरिता नक्त मापन) विनियम, २०१५ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ लिगल/ २०१५/ ६३९, दिनांकित १० सप्टेंबर, २०१५.

२. अधिसूचना क्रमांक २६ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१० प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ लिगल/२०१०/४८३, दिनांकित ७ जून, २०१०.

३. अधिसूचना क्रमांक २७ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ लिगल/२०१०/४८२, दिनांकित ७ जून, २०१०.

४. अधिसूचना क्रमांक २८ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज मागणी व्यवस्थापन कार्यान्वित करण्याची चौकट) विनियम, २०१० प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/लिगल/ १११/ २०१०/ १८०, दिनांकित २६ एप्रिल, २०१०.

५. अधिसूचना क्रमांक २९ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज मागणी व्यवस्थापनाच्या परिमापन आणि कार्यक्रमाच्या खर्चाच्या परिणामकारकतेचे निर्धारण) विनियम, २०१० प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/लिगल/१११/२०१०/१८१, दिनांकित २६ एप्रिल, २०१०.

६. अधिसूचना क्रमांक ५२ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१५ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ लिगल/२०१५/०९३३, दिनांकित १० नोव्हेंबर, २०१५.

७. अधिसूचना क्रमांक २५ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कर्मचाऱ्यांची सेवा -भरती आणि सेवा शर्ती) विनियम, २००७ प्रसिद्ध करणारी अधिसूचना दिनांकित १७ जानेवारी, २००७.

८. अधिसूचना क्रमांक ३० - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कर्मचाऱ्यांची सेवा-भरती आणि सेवा शर्ती) (सुधारणा) विनियम, २०११ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/प्रशा./२०११/ ०२३४३, दिनांकित १६ मार्च, २०११.

९. अधिसूचना क्रमांक ३१ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधी) विनियम, २०१२ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/प्राग्राप्र/प्रशा/२०१२/५२९, दिनांकित ८ जून, २०१२.

१०. अधिसूचना क्रमांक ३२ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) (सुधारणा) विनियम, २०११ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एमईआरसी/ लिंगल/ सु./२७१०/२०७४, दिनांकित २८ जानेवारी, २०११.

११. अधिसूचना क्रमांक ३३ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/टीआरएफ/एमवायटी विनियम/२०११/२१५६, दिनांकित ४ फेब्रुवारी, २०११.

१२. अधिसूचना क्रमांक ३४ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) (पहिली सुधारणा) विनियम, २०११ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/टीआरएफ/ एमवायटी विनियम/२०११/०१८६१, दिनांकित २१ ऑक्टोबर, २०११.

१३. अधिसूचना क्रमांक ३५ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) (दुसरी सुधारणा) विनियम, २०१३ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/टीआरएफ/एमवायटी- विनियम/२०१३/ ०२२३३,दिनांकित १८ फेब्रुवारी, २०१४.

१४. अधिसूचना क्रमांक ३६ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) (तिसरी सुधारणा) विनियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/टीआरएफ/एमवायटी-विनियम/२०१४/०२५७, दिनांकित ८ मे, २०१४.

१५. अधिसूचना क्रमांक ५३ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०१५ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ लिगल/२०१५/१०८४, दिनांकित ८ डिसेंबर, २०१५.

१६. अधिसूचना क्रमांक ३७ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेडच्या (एमएडीसी) मिहान विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१३ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ तांत्रिक/परवाना अटी/ एमएडीसी/ २०१३/१६५५,दिनांकित ३ डिसेंबर, २०१३.

१७. अधिसूचना क्रमांक ३८ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे.सिरिन प्रॉपटीज प्रायव्हेट लि.(एसपीपीएल) च्या ऐरोली, ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१३ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ तांत्रिक/परवाना अटी/ एसपीपीएल/ २०१३/०१०८९, दिनांकित २१ ऑगस्ट, २०१३.

(शा.म.मु.) एचबी १०६०—५ (६५५—७—२०१६)

१८. अधिसूचना क्रमांक ३९ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. इक्सोरा कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडच्या पनवेल, महाराष्ट्र येथील सेवाक्षेत्रविषयक विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ / तांत्रिक/ परवाना अटी/इक्सोरा/२०१४/०९५, दिनांकित १० एप्रिल, २०१४.

१९. अधिसूचना क्रमांक ४० - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे.क्वॅड्रॉन बिझिनेस पार्क लि. (क्यु बी पी एल) च्या प्लॉट क्र.२८, राजीव गांधी इन्फो टेक पार्क, फेज-२ हिंजेवाडी, पुणे, येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/तांत्रिक/परवाना अटी/क्युबीपीएल/२०१४/ ०४८, दिनांकित ७ एप्रिल, २०१४.

२०. अधिसूचना क्रमांक ५४ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे.गिगाप्लेक्स इस्टेट प्रा.लि.(जीइपीएल), ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली, जिल्हा ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१५ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ तांत्रिक/ परवाना अटी/ जीइपीएल/ २०१५, दिनांकित २३ डिसेंबर,२०१५.

२१. अधिसूचना क्रमांक ४१ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/तांत्रिक /पामुप्र /विनियम/२०१४/५६१, दिनांकित २५ जून, २०१४.

२२. अधिसूचना क्रमांक ४२ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ / तांत्रिक / विमुप्र / विनियम / २०१४, दिनांकित २५ जून, २०१४.

२३. अधिसूचना क्रमांक ४३ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ लिगल/२०१४, दिनांकित २० मे, २०१४.

२४. अधिसूचना क्रमांक ५८ - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वायुवर आधारित विद्युत निर्मिती क्षमतेच्या वापरासाठीच्या योजनेचे कार्यान्वयन) विनियम, २०१६ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ /तांत्रिक /विनियम /२०१६ /१३२१, दिनांकित २० जानेवारी, २०१६.

२५. अधिसूचना क्रमांक ५० - महाराष्ट्र वीज लायसनधारकांचे काम, नियम, २०१२ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक नियम-२००८/प्र.क्र.२१७/एनआरजी. ३, दिनांकित ११ मे, २०१२.

२६. अधिसूचना क्रमांक ५६ - मुंबई उद्वाहन (चौदावी सुधारणा) नियम, २०१५ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक उअनि,२०१५/प्र.क्र.६/ऊर्जा-५,दिनांकित२४ नोव्हेंबर, २०१५.

(सहा)

परिशिष्ट- चार

परिशिष्ट-चार

कार्यावलीचे परिशिष्ट

उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभाग

१. **अधिसूचना क्रमांक २४** - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक यंत्रणांकरिता नक्त मापन) विनियम, २०१५ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ लिगल/ २०१५/ ६३९, दिनांकित १० सप्टेंबर, २०१५.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १८ मे, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

२. **अधिसूचना क्रमांक २६** - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१० प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ लिगल/ २०१०/४८३, दिनांकित ७ जून, २०१०.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १८ मे, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

३. **अधिसूचना क्रमांक २७** - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ लिगल/ २०१०/४८२, दिनांकित ७ जून, २०१०.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १८ मे, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

४. **अधिसूचना क्रमांक २८** - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज मागणी व्यवस्थापन कार्यान्वित करण्याची चौकट) विनियम, २०१० प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/लिगल/१११/ २०१०/ १८०, दिनांकित २६ एप्रिल, २०१०.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १८ मे, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

५. **अधिसूचना क्रमांक २९** - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज मागणी व्यवस्थापनाच्या परिमापन आणि कार्यक्रमाच्या खर्चाच्या परिणामकारकतेचे निर्धारण) विनियम, २०१० प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ लिगल/१११/२०१०/१८१, दिनांकित २६ एप्रिल, २०१०.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १८ मे, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

६. **अधिसूचना क्रमांक ५२** - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१५ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ / लिगल/२०१५/०९३३, दिनांकित १० नोव्हेंबर, २०१५.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १८ मे, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

७. **अधिसूचना क्रमांक २५** - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कर्मचाऱ्यांची सेवा-भरती आणि सेवा-शर्ती) विनियम, २००७ प्रसिद्ध करणारी अधिसूचना दिनांकित १७ जानेवारी, २००७.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १८ मे, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

८. **अधिसूचना क्रमांक ३०** - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कर्मचाऱ्यांची सेवा-भरती आणि सेवा-शर्ती) (सुधारणा) विनियम, २०११ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ प्रशा./ २०११/ ०२३४३, दिनांकित १६ मार्च, २०११.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १८ मे, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

९. **अधिसूचना क्रमांक ३१** - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधी) विनियम, २०१२ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ प्राग्राप्र/ प्रशा/२०१२/५२९, दिनांकित ८ जून, २०१२.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १८ मे, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

१०. **अधिसूचना क्रमांक ३२** - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) (सुधारणा) विनियम, २०११ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एमईआरसी/ लिंगल/ सु./२७१०/२०७४, दिनांकित २८ जानेवारी, २०११.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १८ मे, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

११. **अधिसूचना क्रमांक ३३** - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ टीआरएफ/एमवायटी विनियम/ २०११/ २१५६, दिनांकित ४ फेब्रुवारी, २०११.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १८ मे, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

१२. अधिसूचना क्रमांक ३४ – महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) (पहिली सुधारणा) विनियम, २०११ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/टीआरएफ/ एमवायटी विनियम/ २०११/ ०१८६१, दिनांकित २१ ऑक्टोबर, २०११.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १८ मे, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनियम केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

१३. अधिसूचना क्रमांक ३५ – महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) (दुसरी सुधारणा) विनियम, २०१३ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/टीआरएफ/एमवायटी-विनियम/२०१३/ ०२२३३,दिनांकित १८ फेब्रुवारी, २०१४.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १८ मे, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनियम केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

१४. अधिसूचना क्रमांक ३६ – महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) (तिसरी सुधारणा) विनियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/टीआरएफ/एमवायटी-विनियम/२०१४/०२५७, दिनांकित ८ मे,२०१४.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १८ मे, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

१५. अधिसूचना क्रमांक ५३ – महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०१५ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ लिगल/२०१५/१०८४, दिनांकित ८ डिसेंबर, २०१५.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १८ मे, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

१६. अधिसूचना क्रमांक ३७ – महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेडच्या (एमएडीसी) मिहान विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१३ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/तांत्रिक/परवाना अटी/ एमएडीसी/ २०१३/ १६५५, दिनांकित ३ डिसेंबर, २०१३.

१७. अधिसूचना क्रमांक ३८ – महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे.सिरिन प्रॉपटीज प्रायव्हेट लि.(एसपीपीएल) च्या ऐरोली, ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१३ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ तांत्रिक/परवाना अटी/ एसपीपीएल/ २०१३/०१०८९, दिनांकित २१ ऑगस्ट, २०१३.

१८. अधिसूचना क्रमांक ३९ – महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे.इक्सोरा कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडच्या पनवेल, महाराष्ट्र येथील सेवाक्षेत्रविषयक विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/तांत्रिक/परवाना अटी/ इक्सोरा/ २०१४/०९५, दिनांकित १० एप्रिल, २०१४.

१९. अधिसूचना क्रमांक ४० – महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे.क्वॅड्रॉन बिझिनेस पार्क लि. (क्यु बी पी एल) च्या प्लॉट क्र.२८, राजीव गांधी इन्फो टेक पार्क, फेज-२ हिंजेवाडी, पुणे, येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ तांत्रिक/ परवाना अटी/ क्युबीपीएल/२०१४/०४८, दिनांकित ७ एप्रिल, २०१४.

२०. अधिसूचना क्रमांक ५४ – महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे.गिगाप्लेक्स इस्टेट प्रा.लि.(जीइपीएल), ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली, जिल्हा ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१५ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ तांत्रिक/ परवाना अटी/ जीइपीएल/ २०१५, दिनांकित २३ डिसेंबर,२०१५.

समितीने उपरोक्त अधिसूचना क्र. ३७, ३८, ३९, ४० ते ५४ या अधिसूचनांवर दिनांक १४ जून, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व त्यावर खालीलप्रमाणे शिफारशी सुचविल्या आहेत.

१. राज्यातील एखादा कारखाना एमआयडीसी मध्ये असल्यास त्या कारखान्यास ६.२१ रुपये प्रति युनिट या दराने वीज देण्यात येते. परंतु तोच कारखाना विशेष आर्थिक क्षेत्रात असल्यास त्या कारखान्यात २.२५ रुपये प्रति युनिट दराने वीज देण्यात येते. दरामधील ही तफावत ग्रामीण भागातील कारखानदारीला पोषक ठरू शकणार नाही. उद्योग वाढीसाठी चालना / उत्तेजन देणे व विकास साधणे हा शासनाचा एकंदरीत उदात्त हेतू विचारात घेऊन वीज दराबाबत समतोल राखण्याच्या दृष्टीने शासनाने योग्य ती कार्यवाही करावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्याच्या आत देण्यात यावी.

२. सेझ क्षेत्रासाठी अधिसूचित केलेल्या कंपन्या जोपर्यंत त्यांचे इन्फ्रास्ट्रक्चर तयार होत नाही तसेच जोपर्यंत त्यांना परवडते तोपर्यंत ते महावितरणकडून वीज घेतात. मग त्यांचे इन्फ्रास्ट्रक्चर तयार झाल्यानंतर दुसरीकडून वीज घेतात. तेव्हा इन्फ्रास्ट्रक्चर तयार झाल्यानंतरही काही ठराविक कालावधी करिता त्यांनी महावितरणकडून वीज घेणे बंधनकारक करावे, या संदर्भात योग्य ती कार्यवाही करून नियम तयार करावेत अशी शिफारस समिती शासनास करीत आहे, यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्याच्या आत देण्यात यावी.

३. सदर अधिसूचनांसंदर्भातील अंतिम नियम उपविधान समितीकडे २ ते ३ वर्षाच्या विलंबाने पाठविण्यात आले. नियम पाठविण्यास झालेल्या विलंबाबाबत समितीने नापसंती व्यक्त केली असून विभागाने भविष्यात प्रत्येक अधिनियमांतर्गत असलेल्या तरतुदींनुसार तयार केलेले नियम प्रसिद्ध केल्याबरोबर ते उपविधान समितीकडे पाठविण्याबाबत दक्षता घ्यावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे.

२१. अधिसूचना क्रमांक ४१ – महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/तांत्रिक /पामुप्र /विनियम/२०१४/५६१, दिनांकित २५ जून, २०१४.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १४ जून, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

२२. अधिसूचना क्रमांक ४२ – महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम,२०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/तांत्रिक/विमुप्र/विनियम/२०१४, दिनांकित २५ जून, २०१४.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १४ जून, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व खालील शिफारस सुचविली आहे.

भारतीय राज्य घटनेने सर्व बालकांना शिक्षणाचा हक्क मान्य केला आहे. त्यानुसार वयाच्या १४ व्या वर्षापर्यंतच्या बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचा कायदा केला आहे. आज मराठी शाळा फक्त काही टक्क्यांमध्ये शिल्लक राहिल्या आहेत, त्यामुळे राज्यातील सर्व बालकांना शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने राज्यातील सर्व प्राथमिक शाळांना कमी दराने वीज पुरवठा करण्याची नितांत गरज लक्षात घेऊन राज्यातील सर्व प्राथमिक शाळांना कमी दराने वीज पुरवठा करण्यात यावा अशी शिफारस समिती शासनास करीत आहे. या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्याच्या आत देण्यात यावी.

२३. अधिसूचना क्रमांक ४३ – महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ लिगल/२०१४, दिनांकित २० मे, २०१४.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १४ जून, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

२४. अधिसूचना क्रमांक ५८ – महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वायुवर आधारित विद्युत निर्मिती क्षमतेच्या वापरासाठीच्या योजनेचे कार्यान्वयन) विनियम, २०१६ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ तांत्रिक /विनियम /२०१६ /१३२१, दिनांकित २० जानेवारी, २०१६.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १४ जून, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

२५. अधिसूचना क्रमांक ५० – महाराष्ट्र वीज लायसनधारकांचे काम, नियम, २०१२ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक नियम २००८/प्र.क्र.२१७/एनआरजी. ३, दिनांकित ११ मे, २०१२.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १४ जून, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

२६. अधिसूचना क्रमांक ५६ – मुंबई उद्वाहन (चौदावी सुधारणा) नियम, २०१५ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक उअनि,२०१५/प्र.क्र.६/ऊर्जा-५,दिनांकित २४ नोव्हेंबर, २०१५.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १४ जून, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

(सात)

समितीच्या बैठकींचे कार्यवृत्त

बैठकींचे कार्यवृत्त

उप विधान समितीची बैठक बुधवार, दिनांक १८ मे, २०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता कक्ष क्रमांक २००१ (विसावा मजला) येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.—

उपस्थिती

१. श्री. विजयराव औटी, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

२. ॲड. रामचंद्र अवसरे, वि.स.स.

३. श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

४. श्री. सुरेश भोळे, वि.स.स.

५. श्री. विक्रम काळे, वि.प.स.

६. श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१. श्री. सुभाषचंद्र मयेकर, उप सचिव.

२. श्रीमती पूनम ढगे, अवर सचिव.

विभागीय प्रतिनिधी :

१. श्री. राजेंद्र आंबेकर, संचालक (टेरीफ), एमईआरसी

२. श्री. पी. एस. वऱ्हाडे, संचालक (ईई), एमईआरसी

३. श्री. घनश्याम जी. पाटील, उप संचालक, तांत्रिक, एमईआरसी

४. श्री. बाळू लहू उगले, उप संचालक, तांत्रिक, एमईआरसी

५. श्री. सिद्धार्थ बाबुराव रोकडे, उप संचालक, तांत्रिक, एमईआरसी

६. श्री. प्रशांत भाऊराव भांगरे, उप संचालक, प्रशासन व वित्त, एमईआरसी

७. श्री. अरुण वाळूंज, कक्ष अधिकारी, एमईआरसी

८. श्री. हर्षल पाटील, रिक्वॉयरेटरी ऑफीसर, एमईआरसी.

उक्त बैठकीत समितीने उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभाग (अधिसूचना क्र. २४, २६, २७, २८, २९, ५२, २५, ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३५, ३६ व ५३) या अधिसूचनांवर समितीने विचारविनिमय केला व त्यावर कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

उप विधान समितीची बैठक मंगळवार, दिनांक ३१ मे, २०१६ रोजी दुपारी १२-०० वाजता (कक्ष क्रमांक २००१) विधान भवन मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.—

उपस्थिती

(१) श्री. विजयराव औटी, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

(२) ॲड. रामचंद्र अवसरे, वि.स.स.

(३) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(४) ॲड. संजय धोटे, वि.स.स.

(५) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स.

(६) श्री. संग्राम जगताप, वि.स.स.

(७) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(८) श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्रीमती पुनम ढगे, अवर सचिव.

श्रीमती सीमा तांबे, कक्ष अधिकारी.

उक्त बैठकीत समितीने उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभागाच्या (अं.३७) अधिसूचनेवर विचारविनिमय करुन उर्जा विभागाच्या व विद्युत नियामक आयोगाच्या अधिसूचनांसंदर्भात साक्ष घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

उप विधान समितीची बैठक मंगळवार, दिनांक १४ जून, २०१६ रोजी दुपारी १-०० वाजता कक्ष क्रमांक ७१२ (सातवा मजला), विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.–

उपस्थिती

(१) श्री.विजयराव औटी, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

(२) ॲड.रामचंद्र अवसरे, वि.स.स.

(३) श्री.अतुल भातखळकर, वि.स.स.

(४) श्री.सुरेश भोळे, वि.स.स.

(५) श्री.अशोक पाटील, वि.स.स.

(६) श्री.विक्रम काळे, वि.प.स.

(७) श्री.आनंद ठाकूर, वि.प.स.

(८) श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री.सुभाषचंद्र मयेकर, उप सचिव.

(२) श्रीमती पुनम ढगे, अवर सचिव.

(३) श्रीमती सीमा तांबे, कक्ष अधिकारी.

विभागीय अधिकारी

(१) श्री.बिपिन श्रीमाळी, प्रधान सचिव, ऊर्जा विभाग व सीएमडी महानिर्मिती

(२) श्री.संजीव कुमार, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी

(३) श्री.राजीव कुमार मित्तल, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी

(४) श्री.राजेंद्र आंबेकर, संचालक, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

(५) श्री.प्रफुल्ल वऱ्हाडे, संचालक, विद्युत अभियांत्रिकी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

(६) श्री.जयकुमार श्रीनिवासन, संचालक (वित्त), महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी

(७) श्री.राजेश चलवादी, उप संचालक, (प्रशासन व वित्त) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

(८) श्री.सिद्धार्थ रोकडे, उप संचालक (तांत्रिक), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

(९) श्री.बाळु उगले, उप संचालक, (तांत्रिक) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

(१०) श्री.राकेश गुहागरकर, उप संचालक (तांत्रिक) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

(११) श्री.प्रशांत भांगरे, उप संचालक (प्रशासन व वित्त) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग.

(१२) श्री.भि.य. मंता, उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभाग

(१३) श्री.सु.रा. बागडे, मुख्य विद्युत निरीक्षक, उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभाग

(१४) श्री.उमाकांत धामणकर, मुख्य अभियंता (आरसीडी), महाजनको

(१५) श्री.विजय राठोड, अधीक्षक अभियंता, आरसीओ, महानिर्मिती

(१६) श्री.हर्षल प्र.पाटील, नियामक अधिकारी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग.

उक्त बैठकीत समितीने उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभागाच्या अधिसूचनांसंदर्भात संबंधित विभागीय सचिवांची व संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली व अधिसूचना क्र.३७, ३८, ३९, ४०, ५४ व ४२ या अधिसूचनांवर शिफारशी सुचविल्या आहेत तसेच अधिसूचना क्र.४१, ४३, ५८, ५० व ५६ या अधिसूचनांवर समितीने विचारविनिमय केला व त्यावर काहीही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

उप विधान समितीची बैठक बुधवार, दिनांक २७ जुलै,२०१६ रोजी दुपारी १-०० वाजता, कक्ष क्रमांक २००२, विसावा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :–

उपस्थिती

(१) श्री. विजयराव औटी, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री.अतुल भातखळकर, वि.स.स.

(३) श्री.अमल महाडीक, वि.स.स.

(४) श्री.सुरेश भोळे, वि.स.स.

(५) श्री.अमर काळे, वि.स.स.

(६) श्री.सुभाष ऊर्फ पंडीतशेठ पाटील, वि.स.स.

(७) श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री.सुभाषचंद्र मयेकर, विशेष कार्य अधिकारी.

(२) श्रीमती पुनम ढगे, अवर सचिव.

(३) श्रीमती सीमा तांबे, कक्ष अधिकारी.

सदरहू बैठकीत समितीने आदिवासी विकास विभागाची प्रारूप अधिसूचना विचारात घेतली व उपविधान समितीच्या तिसऱ्या प्रारुप अहवालावर विचारविनियम केला व तो किरकोळ सुधारणांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई